महाराष्ट्र शासन

# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

२८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१

दूरध्वनी क्र. ०२०/२६३३३७४३

Email ID-tes.trti-mh@nic.in

www.trti.maharashtra.gov.in


**क्रमांक- संशोधन-२०२६/प्र.क्र.७३/का-४/४१४** **दिनांक:३१ जुलै, २०२६**

## अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकरीता पीएच.डी करिता अधिछात्रवृत्ती

(STRF-2025)

### अर्ज मागविण्याबाबत सूचना

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत पीएच.डी करणा-या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी '**अधिछात्रवृत्ती**' (Scheduled Tribe Research Fellowship) योजना राबविण्यात येते. सन २०२५ या वर्षात विद्यापीठांकडुन कायम नोंदणी (Admission Confirmed) असलेल्या पात्रताधारक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची या योजनेच्या लाभासाठी निवड करण्यात येणार आहे. त्याकरिता https://fellowship.trti-maha.in/ किंवा https://trti.maharashtra.gov.in/ (टीआरटीआय प्रकल्प ➔ अधिछात्रवृत्ती ) या संकेतस्थळावर योजनेचा सविस्तर तपशिल, मार्गदर्शक तत्वे,नियमावली,विविध नमुने व आवश्यक माहिती प्रसिध्द करण्यात आली आहे.

त्यानुसार पात्र उमेदवारांकडुन वरील संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात येत आहेत.योजनेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे असतील.

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

- अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
- अर्जदार अनुसूचित जमातीचा असावा व अर्जाच्या दिनांकास अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र असावे.
- सदर अर्जदाराने सन २०२५ या वर्षात शासनमान्य विद्यापीठामध्ये Ph.D करिता केलेली नोंदणी विद्यापीठाने मान्य (Confirm) केलेली असावी.
- अनुसूचित जमातीच्या उमेदवाराचे व त्याच्या कुटुंबाचे सर्व मार्गाने मिळून वार्षिक उत्पन्न ८ लक्ष पेक्षा कमी असावे.
- आदिम जमातीच्या उमेदवारांना प्राधान्य .
- महिला ,दिव्यांग व अनाथ या साठी अनुक्रमे ३०%, ४% व १ % जागा आरक्षित .
- पदव्युत्तर पदवी (PG) करीता किमान B+ ग्रेड गुण मिळणे आवश्यक आहे.
- सदर योजनेचा लाभ घेणेसाठी उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष इतकी असेल.
- शासकीय सेवेतील उमेदवार लाभास अपात्र .
- योजना कालावधीत उमेदवाराची ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य.
- निवड झालेल्या उमेदवारांने तात्काळ रुजू होणे बंधनकारक व ७ दिवसात हमीपत्र सादर करणे अनिवार्य.
- पीएच.डी अधिछात्रवृत्ती करीता अर्जदाराने **NET / SET / GATE /GPAT** किंवा कोणतेही समतुल्य राष्ट्रीय/ राज्य /विद्यापीठस्तरीय संशोधन पात्रता परीक्षा विहित पात्रता गुणांसह (किंवा गुणांच्या आवश्यक मर्यादेसह) उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे.
- अर्जदाराने https://fellowship.trti-maha.in/ या संकेतस्थळावर योजनेच्या प्रसिध्द करण्यात आलेल्या सविस्तर माहितीत नमुद अटी, शर्तींची पुर्तता करणे बंधनकारक राहील.
- या योजनेअंतर्गत अर्जदारास योजनेसाठी नोंदणी कायम झालेल्या दिनांकापासुन पाच वर्ष किंवा संशोधन प्रबंध विद्यापीठात सादर करण्याच्या दिनांक यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीकरीता अधिछात्रवृत्ती लाभ अनुज्ञेय राहील. तदनंतरच्या कालावधीसाठी कोणताही लाभ अनुज्ञेय राहणार नाही.
- **अर्ज सादर करण्याची मुदत :** दिनांक: **०१/०८/२०२६ सकाळी १०.००** ते दिनांक: **३१/०८/२०२६ रात्री १२.००** पर्यंत चालु राहतील. तद्नंतर येणारे अर्ज स्विकृत होणार नाहीत.

वरील अटी, शर्ती व संकेतस्थळावरील तपशीलांचे अवलोकन करुन पात्रताधारक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी विहित मुदतीत सर्व कागदपत्रांसह संकेतस्थळावर अर्ज सादर करुन सदर अर्ज सर्व कागदपत्रांसह एक प्रत एका फाईलमध्ये या कार्यालयास पुढील ८ दिवसाच्या आत पोस्टाव्दारे/समक्ष सादर करावी . योजनेच्या वरील अटी व शर्ती, प्रसिध्द तपशिलात योग्य तो बदल करण्याचा/ रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी राखून ठेवलेला आहे.

Sd/-

**आयुक्त,**

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**

**महाराष्ट्र राज्य, पुणे**